ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.519
YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal
Oct-Nov-Dec 2024
Vol. 13 No. 4

# स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणात धर्माचा प्रभाव

**गणेश शिवलाल माळी**

*संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.*

*Corresponding Author: गणेश शिवलाल माळी*

**DOI - 10.5281/zenodo.14684605**

***सारांश :***

*भारतीय राजकारणातील धर्माचा प्रभाव हा एक जटिल आणि संवेदनशील विषय आहे. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात धर्म आणि राजकारण यांचे परस्परसंबंध ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आणि आजही वादग्रस्त आहेत. भारतीय राजकीय व्यवस्थेत धर्म आणि प्रादेशिक राजकारण यांचा परस्पर संबंध खूप गुंतागुंतीचा आहे. भारतातील विविध प्रादेशिक भागांमध्ये धार्मिक, सांस्कृतिक, आणि भाषिक विविधता पाहायला मिळते. प्रादेशिक राजकारणामध्ये धर्म महत्त्वाची भूमिका बजावतो, कारण तो मतदारांच्या भावनांवर प्रभाव टाकून त्यांचे ध्रुवीकरण करतो. वेगवेगळ्या धार्मिक दंगलीही मोठ्या प्रमाणात झालेल्या आपणास दिसून येतात.*

***पारिभाषिक शब्द : धर्म, पक्ष, राजकारण, धार्मिक दंगली.***

**प्रस्तावना :**

भारत हा विविध धर्म, पंथ, आणि संस्कृतींनी नटलेला देश आहे. भारतीय समाजाच्या बहुआयामी रचनेत धर्म हा एक महत्त्वाचा घटक असून, त्याचा प्रभाव केवळ सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांपुरता मर्यादित नाही, तर तो राजकारणाच्या प्रत्येक टप्प्यावर ठळकपणे जाणवतो. धर्म आणि राजकारण यांचा परस्पर संबंध प्राचीन काळापासूनच अस्तित्वात आहे, परंतु स्वातंत्र्योत्तर भारतात त्याचे स्वरूप अधिक व्यापक झाले आहे. धर्माच्या नावावर मतदारांचे ध्रुवीकरण करणे, धार्मिक भावना भडकवून निवडणुकीत फायदा मिळवणे, आणि विशिष्ट धार्मिक समुदायांना आकर्षित करण्यासाठी योजना आखणे, हे भारतीय राजकारणाचे काही महत्त्वाचे पैलू बनले आहेत. संविधानाने भारताला धर्मनिरपेक्ष राष्ट्र घोषित केले असले तरी, राजकीय प्रक्रियेत धर्माचा वापर वारंवार होतो. आजही धर्म आणि राजकारणाचा हा परस्पर प्रभाव भारतीय लोकशाहीसाठी मोठे आव्हान ठरतो आहे. यामुळे धर्मनिरपेक्षतेसारख्या तत्त्वांना धोका निर्माण होतो आणि समाजात तणाव व विषमता वाढण्याची शक्यता निर्माण होते.

**उद्दिष्ट्ये:**

१. राजकीय प्रक्रियेत धर्माचा वापर जाणून घेणे.

२. धर्माचा समाजातील प्रभाव आणि परिणाम समजून घेणे.

**संशोधन पद्धती :**

स्वातंत्र्योत्तर काळातील ऐतिहासिक घटनांचा अभ्यास करून धर्माचा राजकारणावर झालेला प्रभाव समजून घेण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती, सामाजिक संशोधन पद्धती यांच्याधारे प्राथमिक तसेच दुय्यम साधनांचा वापर करून माहिती संकलित केली आहे.

**विषय पवेश :**

**१) धर्म :**

धर्म म्हणजे मानवतेचे मार्गदर्शन करणारे तत्त्वज्ञान, विश्वास, आचारधर्म आणि संस्कृतीचे एक संयोजन आहे, जे व्यक्तीच्या जीवनात आध्यात्मिक, नैतिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून दिशा प्रदान करते. संस्कृती पद्धतींचा समुह आहे. जो मानवाला अध्यात्मिक आणि नैतिक मुल्यांशी जोडतो. बऱ्याच धर्माजवळ सुसंघटीत प्रवृत्ती, धर्मोपदेशक, सदस्यत्व, पवित्र ठिकाणे, धर्मग्रंथ असू शकतात. राजकारणी धर्माचा वापर राजकारणात यश मिळवण्यासाठी करतात.

**२) भारतातील धर्म आणि धर्मावर आधारित राजकीय पक्ष:**

**• हिंदू धर्म:**

भारतात मुख्यत: पसरलेला धर्म असून, वेद, उपनिषद, भगवद गीता आणि पुराणांचे अनुकरण करणारा एक अत्यंत प्राचीन धर्म आहे. यामध्ये पुनर्जन्म, कर्म आणि मोक्ष यांचा मुख्य विचार आहे. १. भारतीय जनता पक्ष (भाजपा) (१९८०): भाजपा हिंदू राष्ट्रवादाचा पुरस्कर्ता मानला जातो आणि न्यायालयीन लढा देऊन दान निधीतून राम मंदिराची उभारणी केली. हे करत असताना तेथील विस्तापितांचा प्रश्न निर्माण झाला. परिणामी लोकसभा निवडणुकीत अयोध्या मध्ये हिंदुत्ववादी भाजपाचा पराभव झाला. २०१९ मध्ये आपल्या संसदीय मार्गाने व राजकीय कौशल्याने कलम ३७० हटविले. व जम्मू व काश्मीरला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा मिळाला. कायम हिंदू धर्माशी संबंधित विचारसरणीला प्रोत्साहन देणे ही या पक्षाची विचारसरणी आहे. २. शिवसेना (१९६६); महाराष्ट्रातील मराठी आणि हिंदुत्ववादी विचारसरणी असलेला पक्ष. धार्मिक तसेच प्रादेशिक मुद्द्यांवर भर. बाबरी मशीद पाडण्यामध्ये या पक्षाचा पाठींबा होता.

**• इस्लाम:**

अरबदेशातून उगम पावलेला आणि अल्लाह आणि मोहम्मद पैगंबर यांवर विश्वास ठेवणारा धर्म. इस्लाममध्ये कुराण हे अंतिम धर्मग्रंथ मानले जात. मुसलमान पाच मुख्य कर्तव्यांचे पालन करतात (पाँच कळमा). **१. ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहाद-उल-मुस्लिमीन (AIMIM) १९२७ :** मुख्यतः मुस्लिम समुदायाचे हितसंबंध जपणारा पक्ष. प्रमुख प्रभाव: तेलंगणा, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, आणि बिहार या राज्यावर असलेला दिसून येतो.

**२. इंडियन यूनियन मुस्लिम लीग (IUML) १९४८:** या पक्षाचा केरळमध्ये प्रमुख प्रभाव आहे.. मुस्लिम समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक विकासावर भर देणे हा पक्षाचा उद्देश आहे.

**• ख्रिश्चन धर्म:**

येशू ख्रिस्त यांचा धर्म. ख्रिश्चन धर्मात बायबल हे मुख्य धर्मशास्त्र आहे आणि त्यामध्ये प्रेम, क्षमा, आणि मोक्षावर अधिक भर दिला जातो. उदा. ऑल इंडिया ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टी (AICDP) ख्रिश्चन समुदायाच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करतो. प्रामुख्याने दक्षिण भारतात प्रभाव आहे.

**• शीख धर्म:**

गुरू नानक यांची शिकवण असलेला धर्म. शीख धर्मामध्ये ईश्वराचे एकत्व, प्रार्थना, सेवा आणि समता यावर जोर दिला जातो. शिरोमणी अकाली दल (SAD) : १९२० पंजाबमधील शीख धर्मीय समुदायाचा मुख्य राजकीय पक्ष. शीख धर्म आणि पंजाबी अस्मिता यांना प्रोत्साहन देतो. याशिवाय बौद्ध ,पारशी हे इतर धर्म कमी प्रमाणात राजकीय क्षेत्रात आहेत.

**३) स्वातंत्र्यानंतर धर्म आणि राजकारण:**

स्वतंत्र भारतात ‘धर्मनिरपेक्षता’ हा संविधानाचा पाया निर्माण झाला. परंतु प्रत्यक्षात धर्माचा राजकारणावर प्रभाव कायम राहिला. १९५१ मध्ये आर.एस.एस. च्या नेतृत्व आणि नियंत्रणा अंतर्गत भारतीय जनसंघ किंवा बी.जे.एस. हा एक राजकीय पक्ष सुरु केला. १९८० मध्ये बी.जे.एस. हा पक्ष बी.जे.पी. मध्ये रुपांतरीत झाला. बी.जे.पी. जो राष्ट्रीय पक्ष बनण्यासाठी आणि त्यावेळचा भारताचा एकमेव मोठा पक्ष काँग्रेसला पर्यायी ठरण्यासाठी संघर्ष करत होता. १९८९ उत्तरप्रदेश मधील अयोध्या येथे रामजन्मभुमी होती असा दावा करुन ते उभारण्याचा ठराव स्वीकारण्यात आला. बी.जे.पी आणि हिंदू राष्ट्रवादी असे प्रतिपादन करतात कि १६ व्या शतकात मुघल शासक बाबरने अयोध्यात बाबरी मशिद बांधण्यासाठी राममंदीर नष्ट केले. सप्टेंबर १९९० भाजप नेते लालकृष्ण आडवाणी यांनी राममंदीराच्या बांधकामाच्या वचनपूर्तीसाठी रथयात्रा हाती घेतली होती. अयोध्या मुद्याने राजकीय लाभ तीव्र झाले. जुलै १९९२ मध्ये लोकसभेतील विरोधी पक्षनेते अडवाणी यांनी संसदेत सांगितले, "तुम्ही ही गोष्ट जाणायलाच हवी की १९८५ मधील संसदेतील २ जागांपासून आम्ही १९९१ मध्ये ११७ जागांवर येऊन पोहचलो आहोत याला प्रामुख्याने कारणीभूत म्हणजे आम्ही हिंदू समस्येला हात घातला." त्यानंतर मे १९९६ मध्ये बीजेपी पहिल्यांदाच राष्ट्रीय स्तरावर एक प्रबळ पक्ष म्हणून प्रगतीशीलपणे उदयास आला. परंतू ते सरकार फक्त १५ दिवस टिकले. त्याला मार्च १९९८ मध्ये राष्ट्रीय लोकशाही संघटनेचे जेतेपद म्हणून पुन्हा सत्ता मिळाली आणि त्याने देशावर मार्च २००४ पर्यंत राज्य केले.

भाजपने हिंदू मतदारसह हिंदू जाणीवेच्या बळकटीकरणासाठी राजकीय आकर्षण दिल्यानंतर आणि मार्च १९९८ मध्ये संयुक्त मंत्रीमंडळ स्थापल्यानंतर बहुसांख्यिक प्रतिपादनाची वाढ ही संस्थात्मक बनली. तथापी सर्वच धार्मिक गट हे विशिष्ट धर्मातील अंतर्गत भेद लपविण्यासाठी आणि आपण सर्व एकाच प्रकारचे आहोत अशी भावना निर्माण करण्यासाठी बनावट पडदा देऊ लागले. अशाप्रकारे एकसंघ हिंदू गटातील जातगटातील

फरक, इस्लाममधील भाषिक आणि विभागीय फरक हे हळूहळू कमी होऊन एकसंघ, एकीकृत धार्मिक ओळख निर्माण होऊ लागली. पंजाब मधील सुवर्ण मंदिराचा वापर अतिरेक्यांकडून युद्ध चालवण्यासाठी केला गेला आणि जेव्हा भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पवित्र धर्मस्थळापासून अतिरेक्यांना दुर सारण्याकरिता ब्ल्यू स्टार मोहिमेची आज्ञा दिली तेव्हा त्यांना त्याची फार मोठी किंमत मोजावी लागली. त्यांची त्यांच्या स्वतःच्या शीख अंगरक्षकांकडून हत्या केली गेली.

दक्षिण भारतातसुद्धा 'धर्म' हा आजघडीला राजकीय वातावरणात वर्चस्ववादी बळ म्हणून उदयास येत आहे. उदाहरणार्थ. केरळ मधील 'इंडियन मुस्लीम लीग' हा स्वतःला मुस्लिमांचा हक्कांचा दावेदार म्हणून दर्शवितो. तेलंगणामधील ओबीसींचा पक्ष ऑल इंडिया मजनिस्ट-ए-इत्तेहाद-उल मुस्लिमीन किंवा ए.आय.एम.आय.एम. हा मान्यताप्राप्त राजकीय पक्ष असून तेलंगणा राज्यात आहे. आणि त्याचे मुख्य कार्यालय हैद्राबादच्या जुन्या शहरात आहे. आणि त्याचे मुळ १९२७ मध्ये स्थापन झालेल्या मजलिस ए इत्तेहादल मुस्लिमीन मध्ये आहे. या पक्षाकडे आंध्रप्रदेशातील आणि आता तेलंगणातील मुस्लिमांचा राजकीय प्रतिनिधी म्हणून खूप काळापासून बघितले जात आहे. उत्तरपूर्व भागाने सुद्धा बऱ्याच राजकीय पक्षाचे पुनरुत्थान पाहिले ज्यांचा कल मुख्यत्वेकरुन ख्रिश्चनकडे होता आणि धर्माआधारीत सततच्या राजकीय संघर्षात त्याची परिणती झाली.

**निवडणुका आणि धर्म:**

भारतासारख्या धार्मिक, सामाजिक, आणि सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण देशात 'धर्म' हा निवडणुकांमध्ये राजकीय पक्षांसाठी मतदारांना आकर्षित करण्याचे एक प्रभावी साधन ठरते. धर्माच्या नावाने निवडणुकीचे ध्रुवीकरण करणे आणि विशिष्ट समुदायांवर लक्ष केंद्रित करणे हे निवडणुकीच्या प्रक्रियेत पाहायला मिळते. राजकीय पक्ष विशिष्ट धर्मीय समुदायांना आकर्षित करण्यासाठी प्रचार करतात. उदा. १९९० च्या दशकातील अयोध्या आंदोलन हे धार्मिक ध्रुवीकरणाचे उदाहरण आहे. धर्माच्या नावाने मत मागणे, धार्मिक घोषणा, प्रतीके, आणि प्रचार याद्वारे मतदारांना आकर्षित केले जाते. निवडणूक आयोगाच्या नियमानुसार हे बेकायदेशीर असले तरीही प्रत्यक्षात असे प्रकार घडतात. विशिष्ट धर्मीय समुदायांना भडकवण्यासाठी सांप्रदायिक भाषणे दिली जातात. अनेकदा हे भाषण समाजात तणाव निर्माण करतात. अयोध्या, काशी आणि मथुरा यांसारख्या धार्मिक स्थळांचा मुद्दा निवडणुकीसाठी वापरला जातो. राजकारणापासून धर्म वेगळा होऊ शकला नाही. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर धार्मिक स्थळांचा वापर राजकीय प्रसिद्धीसाठी केला गेला आणि लोकांच्या धार्मिक भावना राज्याचा राजकीय नियंत्रण लाभ मिळविण्यासाठी उत्तेजीत केल्या गेल्या. ह्या धार्मिक राजकारणी पक्षाच्या उदयाने भारतातील निधर्मीपणा धोक्यात आला.

**भारतातील धार्मिक दंगली :**

• **फाळणीचा काळ १९४७:** भारताच्या आणि पाकिस्तानच्या फाळणीनंतर हिंदू आणि मुस्लिम समुदायांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला. लाखो लोक मृत्युमुखी पडले आणि लाखो लोक विस्थापित झाले.

• **अहमदाबाद दंगल १९६९:** गुजरातमध्ये हिंदू-मुस्लिम दंगल झाली. या दंगलीत शेकडो लोक मरण पावले आणि धार्मिक तणाव अधिकच वाढला.

• **शीखविरोधी दंगल १९८४:** पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाल्यानंतर शीख समुदायाविरोधात मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला. या हिंसाचारात हजारो शीख लोकांचे जीव गेले.

• **बाबरी मशीद प्रकरण १९९२:** अयोध्येत बाबरी मशीद पाडल्यानंतर देशभर हिंदू-मुस्लिम दंगली उसळल्या. मुंबई, सूरत, कानपूर, आणि दिल्लीसारख्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचार झाला.

• **गुजरात दंगल २००२:** 'गोध्रा' कांडानंतर गुजरातमध्ये हिंदू-मुस्लिम समुदायांमध्ये प्रचंड हिंसाचार झाला. हजारो लोक मृत्युमुखी पडले आणि अनेक लोक विस्थापित झाले.

• **मुजफ्फरनगर दंगल २०१३:** उत्तर प्रदेशातील मुजफ्फरनगरमध्ये हिंदू-जाट आणि मुस्लिम समुदायांमध्ये संघर्ष झाला. यात शेकडो लोकांचा मृत्यू झाला आणि हजारो लोक बेघर झाले.

• **दिल्ली दंगल २०२०:** नागरिकत्व सुधारणा कायद्यावरून झालेल्या विरोध प्रदर्शनांदरम्यान दिल्लीतील उत्तर-पूर्व भागात हिंदू-मुस्लिम हिंसाचार झाला. यात ५० हून अधिक लोक मरण पावले.

**४) राजकारणात धर्माचा प्रभाव कमी करण्यासाठी उपाय:**

**i) धर्मनिरपेक्षतेची सक्तीची अंमलबजावणी:** संविधानाने दिलेली धर्मनिरपेक्षतेची तत्त्वे प्रभावीपणे लागू केली पाहिजेत. धार्मिक प्रचारावर बंदी आणली पाहिजे. निवडणूक आयोगाने मोठ्या प्रमाणात निवडणुकीत धार्मिक प्रचार करून किंवा धर्माच्या आधारावर समाजामध्ये मते मागणाऱ्या राजकीय पक्षावर बंधने आणने किंवा त्यांच्यावर कारवाई करणे.

**ii) धर्म आणि शिक्षण:** शिक्षण प्रणालीत धर्म आणि सहिष्णुतेबद्दल सकारात्मक दृष्टिकोन रुजवला पाहिजे. नागरिकांमध्ये प्रादेशिक अस्मिता आणि धार्मिक सहिष्णुतेची भावना निर्माण करावी.

**iii) धर्मावर आधारित राजकारणाला आळा:** धर्माच्या नावावर राजकारण करणाऱ्या पक्षांवर आणि नेत्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

**५) धर्म आणि प्रादेशिक राजकारणातील आव्हाने:**

**i) धर्माच्या नावावर मतदारांचे ध्रुवीकरण:** धार्मिक ध्रुवीकरणामुळे प्रादेशिक अस्मिता आणि विकासाला कमी महत्त्व दिले जाते. परिणामी राष्ट्राचा आर्थिक विकास खुंटतो व नवनवीन तंत्रज्ञानात विकासाऐवजी धार्मिक रूढीना प्राधान्य मिळते.

**ii) धर्मनिरपेक्षतेला धोका:** धर्माचा वापर करून प्रादेशिक राजकारणात धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे उल्लंघन होते.

**iii) प्रादेशिक असंतोष:** धर्माच्या आधारावर प्रांतांमध्ये असंतोष आणि तणाव निर्माण होतो. परिणामी मोठ्या प्रमाणात धार्मिक दंगली उद्भवतात उदा. स्वतंत्र भारतात अनेक धार्मिक दंगली घडल्या, जसे की: १९८४ चे शिख-विरोधी दंगे, २००२ चे गुजरात दंगे, २०२०चा दिल्ली हिंसाचार, CAA च्या विरोधात हिंदू आणि मुस्लिमामध्ये दंगल झाली.

**निष्कर्ष :**

१. भारतीय राजकारण आणि धर्माचा प्रभाव हा जरी ऐतिहासिकदृष्ट्या घट्ट विणलेला असला तरी सध्या भारतासाठी धर्मनिरपेक्षता हीच देशाच्या एकात्मतेसाठी योग्य दिशा आहे.
२. राजकीय पक्षांनी धर्माचा वापर केवळ सत्तेसाठी न करता समाजहितासाठी केला पाहिजे.
३. धर्म आणि राजकारण यामधील संतुलन राखल्यास भारताचा विकास अधिक व्यापक स्वरूपात होऊ शकतो.
४. धार्मिक दंगली आणि राजकीय हेतूंनी प्रेरित हिंसाचार हा आजही गंभीर प्रश्न आहे.
५. लोकशाही मूल्यांशी समन्वय साधून धर्माचा सकारात्मक वापर करणे आणि समाजातील एकता व सलोखा जपणे गरजेचे आहे.
६. स्वातंत्र्यापासून ते आजतागायात भारतातील राजकारणात धर्माचा प्रभाव वाढत चाललेला आपणास दिसून येतो.

**संदर्भ सूची :**

१. https://www.csds.in (how India votes: A CSDS Survey)
२. https://www.jstor.org (बानु झेंनब, (३ जुलै२००९)जस्टोर)
३. गुहा रामचंद्र,(२०१२), “भारत गांधी के बाद” पेंग्विन इंडिया, दिल्ली.
४. शर्मा ज्योतिर्मया,(२००४), “हिंदुत्व” पेंग्विन ग्लोबल,दिल्ली.
५. द रोल ऑफ रिलीजन इन इंडिया (२०१९) इकोनोमिक्स अँड पोलिटिकल विकली.